गोही

एशाजी शेटिये का कल्याण उमर जाफर महमद खट्ट् नवाईत मुसुलमान

वरसे ७५ याणीं जाहीर केलें कीं, निलाजीचे वडिल कसबियाचे कुलकर्णी हे आपणास ठावके आहेत, हकलाजिमा आपण यांस च देत असतो, रामाजीचे वडिल पेसजी निविसिंदे सरकारतर्फेनें होतें हें आपणास ठावकें असे.

भिवा चांभार मौजे काटे मानवली ता। अंबरनाथ हाली वस्ती का। मा। उमर वरसें ६० याणीं जाहीर केलें कीं. निलाजीचे वडिलापासोन कसबियाचे कुलकर्ण करीत आहेत हें आपणास ठावकें आहे, बालाजी निसिंदा पूर्वी सरकारतर्फानें होता हें आपणास ठावकें आहे.

साकीन का। मा। वरसें ९० याणीं जाहीर कीं, निलाजीचे वडिल कसबियाचे कुलकर्ण करीत आहेत, आपली जानुपरी शहात्तर वरसें दखत, आहों, रामाजीचा वडिल बालाजी पेसजी नविसिंदा सरकारतर्फानें दरीबीयाचें लिहिणें लिहीत होते.